IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380
ISSN 2319-4766
AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE,2021, VOL- 10, ISSUE-57

Special Issue of Department of Sociology,
Lokmanya Mahavidyalaya Warora, Dist. Chandrapur (MS)


Date: 26 June 2021

# TRIBAL SOCIETY

## IN CONTEMPORARY INDIA : ISSUES , PROBLEMS & REMEDIES

**Chief Editor**
Dr. Subodh Kumar Singh
Principal

**Editor**
Dr. Shrinivas Pilgulwar
Head, Dept of Sociology



Book-2

© : AUTHOR

**Edition** : **Book – II**, 2021

**Disclaimer:** We do not warrant the accuracy or completeness of the Information, text, graphics, links or other items contained within these articles. We accept no liability for any loss, damage or inconvenience caused because of reliance on such content. Only the author is the authority for the subjective content and may be contacted. Any specific advice or reply to query on any content is the personal opinion of the author and is not necessarily subscribed to by anyone else.

**Warning**: No part of this book shall be reproduced, reprinted, or translated for any purpose whatever without prior written permission of the Editor. There will be no responsibility of the publisher if there is any printing mistake. Legal aspect is in Warora jurisdiction only in favour of Editor in Chief for this Special Issue on **TRIBAL SOCIETY IN CONTEMPORARY INDIA: ISSUES, PROBLEMS & REMEDIES**

**NOTE:** Conference proceeding publication / Special issue publication/ Book with ISBN/ **Edited Book with ISBN publication** Contact us on **9881595917** either send your proposal to **srjisarticles16@gmail.com**

An International Peer Reviewed & Refereed

**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**

S. No. 5+4/5+4, TCG'S, Saidatta Niwas, D-Wing, Ph - II,
1st Floor, F. No. 104, Nr. Telco Colony & Blue Spring Society,
Dattanagar-Jambhulwadi Road, Ambegaon (BK), Pune – 411046.
Website: www.srjis.com

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380

ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE, 2021, VOL- 10, ISSUE-57

## Index

| SR. NO. | AUTHOR NAME | PAGE.NO. |
|---|---|---|
| 56 | आदिवासी विकासाकरीता पेसा कायदा १९९६ – एक सामाजिक अध्ययन<br>*प्रा. डॉ. पी. एन. वाघ* | 303-309 |
| 57 | **किनवट –माहूर परिसरातील आदिवासीचा सांस्कृतीक अभ्यास**<br>*प्रा. किशन मिराशे* | 310-312 |
| 58 | स्वातंत्र्य आंदोलन कालखंडातील आदिवासी स्त्रीयांचे प्रेरणादायी कार्य : एक अभ्यास<br>*प्रा. डॉ. मनोहर कुंडलिक थोरात* | 313-316 |
| 59 | **झाडिया जमातः संशोधनात्मक वेध**<br>*डॉ. विशाखा संजय कांबळे* | 317-319 |
| 60 | **आदिवासी विकास आणि शासकीय योजना**<br>*प्रा. डॉ. सुषमा जाधव (लिमकर)* | 320-325 |
| 61 | आदिवासींच्या आरोग्य व आहाराविषयी समस्या<br>*प्रा. प्रकाश कोथळे व शेळके सुदर्शन किशनराव* | 326-332 |
| 62 | **विकासामुळे निर्माण झालेल्या आदिवासींच्या समस्या**<br>*कांचन नारायणराव घोटकेकर* | 333-339 |
| 63 | **नंदुरबार जिल्हयातील आदिवासीं लोकांच्या आरोग्य विषयक समस्या :- एक दृष्टीक्षेप**<br>*डॉ. प्रो. डी. आर. जगताप व वसावे रामदास रमेश* | 340-343 |
| 64 | महाराष्ट्रातील पेसा कायदा अंमलबजावणी: कायद्यात्मक आकलन<br>*प्रा. डॉ. ए. आर. वागडव* | 344-352 |
| 65 | आदिवासी समाजातील आरोग्य आणि पोषणासंबंधी समस्या<br>*प्रा. विठ्ठल शामराव आत्राम* | 353-363 |

| | | |
|---|---|---|
| 66 | गडचिरोली जिल्ह्याच्या नक्षलग्रस्त क्षेत्रातील आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक समस्या<br>*तेजराम यादव गायधने* | 364-373 |
| 67 | **भारतातील आदिवासीच्या आर्थिक समस्या**<br>*प्रा. सुनिल देवराव मिरासे* | 374-380 |
| 68 | **समकालीन भारतातील आदिवासी चळवळी**<br>*प्रा. शिंगटे. आर. जी* | 381-287 |
| 69 | महाराष्ट्रातील आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक समस्या<br>*प्रा. सतिश गोवर्धन पेटकर* | 388-396 |
| 70 | **आदिवासी समाजाच्या आरोग्यविषयक समस्या: एक समाजशास्त्रीय अध्ययन**<br>*प्रा. रामराव धेनू चव्हाण* | 397-400 |
| 71 | **आदिवासी विकासासंदर्भात विविध शासकीय योजनांचा अभ्यास**<br>*प्रा. रमेश शंकरराव सोनटक्के* | 401-410 |
| 72 | सीमाप्रदेशातील आदिवासी लोकगीतांमधून व्यक्त होणारे लोकजीवन<br>*सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार* | 411-414 |
| 73 | **आदिवासी समाजातील शैक्षणिक समस्येचे अध्ययन**<br>*प्रा. राजकुमार एस. बिरादार* | 415-419 |
| 74 | विदर्भातील आदिवास्यांचे प्रश्न व समस्यांचे समाजशास्त्रीय चिकित्सक अध्ययन<br>*प्रा. लक्ष्मण मारोतराव वानखेडे* | 420-427 |
| 75 | भारतातील आदिवासीच्या समस्या<br>*प्रा. किशन काशिनाथ घोगरे व प्रा. सुदर्शन किशनराव शेळके* | 428-434 |
| 76 | **समकालीन भारतातील आदिवासी समाजाच्या समस्या आणि उपाय**<br>*प्रा. बाळासाहेब विठ्ठलराव तौर* | 435-442 |
| 77 | आदिवासी समुदायातील विविध आजाराचे प्रकार व त्या आजारांवरील उपचाराची साधने<br>*प्रा. डॉ. योगेश प्रल्हाद महाजन* | 443-450 |
| 78 | आदिवासी:'पेसा' कायद्यातील तरतुदी<br>*प्रा. राजु बुरीले* | 451-461 |

# सीमाप्रदेशातील आदिवासी लोकगीतांमधून व्यक्त होणारे लोकजीवन

**सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार**
*संशोधक, पीपल्स कॉलेज, नांदेड*

लोकगीतांच्या माध्यमातून स्त्रिया आपल्या भावना व्यक्त करतात. लोकगीते ही एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत आलेले असते. आदिम मानवी जीवनापासून सद्यस्थितीपर्यंत ही लोकगीतांचे लोकजीवनात अनन्य साधारण असे महत्त्व असलेले दिसते. महाराष्ट्राच्या वेगवेगळया भागात विविध आदिवासी जमातींचे वास्तव्य आढळून येते. त्यांच्या गीतांतून प्राचीन काळचा इतिहास मानवी मनाची जडणघडण, लोकांच्या चालीरिती आणि नादरूप झालेली सामाजिक परिस्थिती मोठया कुशलतेने प्रकट झालेली असते. त्यांच्या प्रदेशातील पशुपक्षी शिकारी आणि डोंगर भाग यांच्या वर्णनांनी ओथंबलेली ही गीते तेथील साक्षात देखावा उभा करतात. ही गीते गातांना व नाचताना तेथील आदिवासी बेभान झालेले असतात.

आदिवासी समाज गरीब, अज्ञानी, सामाजिकदृष्टया मागासलेला असला तरी जीवनातील आनंद लुटण्याची इच्छा व प्रयत्न तो सतत करीत असतो. अज्ञान आणि गरीबीमुळे आदिवासींच्या वाटयाला नागर जीवनातील भौतिक सुखे फार कमी येतात. ते सुख त्यांच्या नाचगाण्यातून मिळवितात. त्यांच्या गीतामधून श्रध्दा, रूढी परंपरा, कला कौशल्य, भावना, संस्कृती यांचे दर्शन घडते.

**संशोधनाची उदिदष्टे**

१) सीमाभागातील आदिवासी लोगीतातील स्त्री–चित्रणाचा आढावा घेणे.

२) सीमाप्रदेशातील आदिवासी लोकगीतांचे स्वरूप अभ्यासणे.

३) आदिवासी लोकगीतांतील वेगळेपण अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके**

१) सीमाप्रदेशातील आदिवासी लोकजीवनात विविध प्रकारच्या चालीरिती आढळून येतात.

२) लग्नविधी – सण समारंभात स्त्रिया एकत्रित येतात आणि लोकगीत गाऊन व्यक्त करतात.

३) आदिवासीचे लोकजीवन विविधतेने नटलेले आहे.

**आदिवासी स्त्री–गीते**

मराठी लोकसाहित्यामध्ये स्त्रीगीतांची परंपरा जतन स्त्रिया कडूनच मोठया प्रमाणावर केलेली दिसते. या लोकगीतांचा गाभा हा स्त्रीयांचे दैनंदिन जीवन, पुरूषप्रधान संस्कृतीचा प्रभाव आणि बहुतांश ग्रामीण जीवनाचा अंतर्भाव दिसून येतो. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत नित्य नैमित्यित कामे, त्याची वर्णने जीवनातील महत्वाच्या बहुतेक सर्व प्रसंगांना उद्‌देशून आदिवासी गीते रचलेली असतात. त्यांच्या लोकगीतांमध्ये नृत्य संगीत आणि नाटय एकरूपतेच्या पातळीवर असते. आदिवासी यांचा अल्पसा परिचय करून घेऊ.

लोकजीवन आणि लोकसंस्कृतीपेक्षाही आदिवासीचे जीवन निसर्ग आणि भूमी यांच्याशी अधिक निगडीत झालेले असते. ते जंगलाचे रहिवाशी असतात. जंगलावर अवलंबून असतात. आदिवासीच्या जीवनामध्ये अन्न, घरे,

देवदेवता, धर्मविधी, विवाहसोहळे यामध्ये जंगलातील वृक्षांना किती महत्व असते हे आपणाला समजणार नाही. हिंदूस्थानात परंपरेने जे संस्कारविधी प्रचलित आहेत. त्यात जन्म, लग्न आणि मृत्यू यांच्याशी संबंधित विधींना फारच महत्वाचे स्थान आहे. सोळा संस्कारांपैकी अनेक संस्कार आता कालबाहय झाले आहेत आणि होत आहेत. जन्म लग्न आणि मर्तिक यासंबंधीचे विधी कायम राहीले. लग्न विधी हा एक महत्वाचा संस्कार मानला जातो. सर्व जाती–जमातीत पूर्वापार चालत आलेली परंपरा म्हणजे लग्नविधीत गाणी म्हणण्याची होय. लग्नात आणि केवळ स्त्रियाच म्हणतात. ग्रामीण भागात अजूनही स्त्रिया लग्नासंबंधी कितीतरी विधी पार पाडतांना गाणी म्हणतात. लग्नविधीतला महत्वाचा सोहळा म्हणजे हळद लागणे.

हळद लागणे म्हणजेच लग्न लागणे असा अर्थ रूढ आहे. हळदीच्या वापराने सौंदर्य वाढते आणि खुलून दिसते. अशी सर्वत्र समजूत आहे. लग्नविधीत हळदीला खुप महत्व आहे. हळद लावण्याची विधी पूर्ण झाल्याशिवाय लग्नविधी पार पाडता येत नाही. सीमाप्रदेशातील काही तालूक्यामध्ये आदिवासी जमातीचे लोक राहतात. सर्वात जास्त किनवट तालूक्यात आहेत. भोकर तालूक्यातही आहेत. विवाहाच्या सोहळयात वधूवरांना हळद लावण्याच्या विधीला आदिवासी भिल्ल समाजातील फारच महत्व दिले जाते. हळदीच्या वेळी नवरा नवरीला गाणी गाताना हळद लावतांना कौतूक करतात, नवरदेवाचे मानाने कौतूक केले जाते आणि तेच नवरीमुलीचे हेटाळणी केली जाते. अशी काही गीते म्हटंली जाते. वधूकडील लोक मात्र वधुचे कौतुक करतात आणि वराचे टिंगल करतात. एका गाण्यात वधुकडील मंडळीचे तिचे कौतूक करतांना म्हणतात. वधुला 'सोन्याच्या पाटावर बस' म्हणतात. आणि वराला मात्र आईच्या मांडीवर बस असे म्हणतात.

बेसी ले वा बेना सोना पाटीले
बेसी ले रा लविंडा यहाँ क्यो मांडयो वे

या गीतात मुलीला चांगली मोकळी बस म्हणतात. आणि नवरदेवाला आईच्या मांडीवर बस म्हणतात. त्याला हालचाल करता येऊ नये म्हणून येथे नवरदेवाची थट्टा मस्करी केली जाते.

''बेना हिरीलिरी बोहोजे सोना पाटीलावे
लविडांवे हिराय नाय ने किराय नाव यहाँ
क्यो माडयो पे''

या गाण्याचा आशय अगदी साधा आणि सोपा असा आहे. आदिवासी जमातीत हळद लावल्यानंतर नाचण्याचा विधी असतो. या गाण्यातून मात्र पाटावर बसविणे असाच होतोत्र

वरपक्षाकडील लोक मात्र नवरीची टिंगल उडवितात. हळद लावून गोरी न होतात्र तू आधीच काळी आहेस माती लावू अजून काजळी सारखी काळी दिसतेस.

''गोरा ता गोरो भायो हिलदयोमें गोरो रे
काली ता काळी लंवडी काजल मे काली रे''

नवरदेव आधीच गोरा असलेला अजून हळद लावल्यावर गोरा दिसत आहे. तू मात्र काळी दिसतेस.

लग्नाच्या प्रसंगी जी गाणी म्हटंली जातात. त्यातून त्यांच्या जीवनातील सुख–दुःखाचे सामाजिक रितीरिवाजांचे दर्शन घडते. त्यांचा समूह भाव प्रकट होते. आदिवासी परंपरेबरोबरच कुटूंबसंस्थेतील नातेसबंधाचाही

परिचय घडतो. लग्न म्हटल्यावर रूसवे–फुगवे हे येतातच. आणि प्रत्येक जाती--जमातीमध्ये आदिवासी भागात लग्नकार्यात मानापानावरून अनेक रूसवे फुगवे होतात. विशेषत: मान पानाच्या वेळी, आहेर चढवतांना महिलांना मिळणाऱ्या साडयावरून अनेक रूसवे होतात. आदिवासी महादेव कोळी जमातीत अशी एक पध्दत असते की लग्न कार्यात वधूच्या आणि वराच्या मामाने आणलेली साडी ही नेसावीच लागते. त्या साडीचा मान पण असतो. त्या साडीचा रंगही हिरवाच असतो. वरमाई आपल्याला आणलेली साडी ही स्वत: न नेसता आपल्या जाऊबाईला नेसायला सांगते. नेहमी आपल्या सोबत राहणाऱ्या जाऊबाईचा मान राखण्यासाठी भावाने आणलेली साडी देते.

या गं मांडवाच्या दारी, या गं मांडवाच्या दारी
जवा जावांच्या रूसवा सखे गं, जावा जावांचा रूसवा
माझ्या बंधुचे पातळ, माझ्या बंधुचे पातळ
जाऊ बाईला नेसवा सखे गं, जाऊ बाईला नेसवा......

या गाण्यातून जाऊला साडी नेसवण्याचा आग्रह धरतेत्र हे लग्नकार्य एकाच दिवसाचे असते परंतू त्या दोघींना कायम एकत्र राहावे लागते. नातेसंबंध निट टिकवायचे असेल तर संकुचित वृत्ती न ठेवता आपल्या जावेची ईच्छा पूर्ण केली पाहिजे म्हणून स्वत:च्या भावाने आणलेली साडी ती आपल्या जावेला देवू इच्छिते. हा उदार दृष्टीकोन आदिवासी स्त्रियांचा स्त्रियांमध्ये दिसते. परंपरा जतन करण्याचे कार्य स्त्री करत असते. धार्मिक विधीमध्ये अशा गीतांचे महत्व असते. कृषिप्रधान भारतीय समाजामध्ये कुटुंबकेंद्री जीवन असल्याने स्त्रियांच्या गीतामधून कुंटुब व्यवस्थेची विविध रूपे दिसतात.

'' देवा मापल्या पिकाला धासे येऊ दे
कणीस पोरं पोटभर खाती असं सरू दे वरीस''

म्हणूनच या भुमीविषयी अपार श्रध्दा असते. या भूमीतून जन्माला आले आहोत. म्हणून तृप्तही होतो. त्यामुळे तो आपल्या भूमीची माती चिमूटभर घेऊन कपाळाला लावतो. अशी अनेक गीते प्रचलित आहेत.

भारतातील सर्वच आदिवासी जमातीमध्ये सण, उत्सव, लग्नविधी, यात्रा इ.प्रसंगी गीते नृत्यासह सादर करण्याची प्रथा आहे. यावरून असे स्पष्ट होते की, अगदी प्राचीन काळापासून हिंदूस्थानातील सर्व जातीजमातींचे लोक त्याचप्रमाणे जन–जातीचे लोकजीवन जगताना गाणी म्हणून आपले जीवन आनंदमय करीत जगत आले आहेत. लोकगीतातून आदिवासी स्त्रीचे जीवन, जीवनाचे विविध थदर स्पष्ट झाले आहेत. स्त्रियांची लोकगीते म्हणजे केवळ संसारातील दु:खे व्यक्त करण्याचे साधन नसून तिच्या मनातील भाव भावना व्यक्त करणारे साधन आहे. स्त्री गीतामध्ये प्रामुख्याने जीवन जगण्याची सकारात्मकता मोठया प्रमाणात दिसते.

सर्वसाधारण सर्वच जातींनी आपापल्या परीने गीतांचे संग्रह केलेले आहेत. आणि ती जोपासून पण ठेवले आहेत. याचे श्रेय भारतातल्या अनंत लौकिक वृतांना आणि लग्नांच्या सोहळयांना आहे. धार्मिक आणि सामाजिक आशयाबरोबरच त्यांच्या भावनांचेही प्रतिबिंब प्रत्ययास येते. संस्कृती आणि त्यांची जीवनसरणी यांचेही प्रतिबिंब प्रत्ययास येते. नृत्य, गीत आणि संगीत हे आदिवासींयांचा जीवनाचे अविभाज्य घटक आहेत.

**निष्कर्ष** :–

१) आदिवासी गीतातून सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते.

२) स्त्रीगीतांमधून जीवन जगण्याची सकारात्मकता मोठया प्रमाणात दिसते.

३) लोकगीतांमधून संस्कृतीचे जतन आणि संवर्धन होत असते.

४) आदिवासींचे जीवन हे निसर्गावर अवलंबून आहे हे दिसून येते.

५) मौखिक परंपरेतून रूढी, परंपरा, लोकस्वभाव, जीवनदर्शन, आचार–विचार प्रकट होतांना दिसतात.

६) आदिवासी लोकगीतात स्त्रियांनी आपला आत्मा ओतलेला आहे.

**संदर्भ :–**


*१) मराठी स्त्री गीते – शरद व्यवहारे, प्रतिभा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती–१९९१.*

*२) आदिवासी लोकगीतांतील स्त्रीजीवन–अलका हिवाळे, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती–२००२.*

*३) लोकसंस्कृतीचे बंध–अनुबंध– द.ता.भोसले, पदमगंधा प्रकाशन, पुणे–२०१०.*

*४) आदिवासी लोकगीतातील स्त्रीजीवन (शोध निबंध)*

*५) लोकसंस्कृतीची अविष्कार रूपे – शिविम संशोधन पत्रिका.*

*६) मौखिक वाङ्मयाची परंपरा – स्वरूप आणि भवितव्य – डॉ. प्रभाकर मांडे गोदावरी प्रकाशन 'मंगलप्रभा' १०९, एन–५ सावरकर नगर सिडको, औरंगाबाद (४३१००३)*

*६) लोकसंस्कृती–स्वरूप आणि विशेष – डॉ. द.ता.भोसले, पदमगंधा प्रकाशन ३६/११, धन्वंतरी सह.गृह.संस्था, पांडुरंग कॉलनी एरंडवन, पुणे. (४११०३८)*